

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •



• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२२ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.१८ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

उत्पादनांतील पारदर्शकता वाढून शेतमालाला चांगले दर मिळणे शक्य : शेतीसाठी एआय धोरणास मंजुरी

पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी, मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

मुंबई (वृत्तसंस्था)–कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री –एआय धोरण २०२५–२०२९ मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आले. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात मोठे परिवर्तन होणार आहे.राज्यातील ग्रीस्टॅक, महा ग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महाडीबीटी यासारख्या प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणी साठी पहिल्या तीन वर्षासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या उपक्रमामुळे उत्पादनांतील पारदर्शकता वाढून शेतमालाला चांगले दर मिळण्यास हातभार लागणार आहे. याशिवाय, निर्यातीत विश्वासार्हता आणि जागतिक बाजारात राज्याच्या शेतमालाची स्वीकारार्हता वाढणार आहे.



आदिवासी भागात औद्योगिक विकास आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील जांबुटके गावातील २९ हेक्टर ५२ आर जमीन ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली.महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई याला गोरेगाव (पश्चिम) येथील मौजे पहाडी परिसरात १,४१,६४०.४० चौरस मीटर जागा हस्तांतरित करण्यात येणार आहे. या जमिनीच्या हस्तांतरणावर लागू होणारे मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला. सध्या विद्यापीठाचे कामकाज पवईतील भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरू आहे. गोरेगावमधील नवीन जागेमुळे चांगली सोय होणार आहे.रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात स्थापन होणाऱ्या मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकल्पाच्या जमिनीवरील मुद्रांक शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही सवलत एमएमआरडीए आणि रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त भागीदारीतील प्रस्तावित प्रकल्पासाठी लागू असेल. १२१७.७१ एकर जमिनीचे हस्तांतरण विशेष उद्देश संस्था च्या नावे करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली.

तहसील कार्यालयातील कंत्राटी सेतू कर्मचाऱ्याचे येणार सुगीचे दिवस

किमान वेतन कायद्याप्रमाणे मिळणार वेतन–आ.करण देवतळे यांचा पुढाकार

सेतू कर्मचारी यांचा विधानसभेत तारांकित प्रश्न लावून शासनाचे लक्ष वेधले येत्या पावसाळी अधिवेशनात मी तो मार्गी लागेल यासाठी पर्यंत करणार.
करण देवतळे,आमदार वरोरा मतदारसंघ

तहसील सेतू केंद्र कर्मचारी यांच्या मागणीचे निवेदन मा आमदार करण देवतळे यांना दिले व त्यांनी तो प्रश्न विधनासभेत तारांकित प्रश्न लावून शासनाचे लक्ष वेधले येत्या पावसाळी अधिवेशनात प्रश निकाली काढावा हीच अपेक्षा
–हितेश भालेराव,सामाजिक कार्यकर्ता

वरोरा । प्रतिनिधी

शासणाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील तहसिल लगत अनेक वर्षांपासून सेतू केंद्र चालू आहे. सदर सेतू केंद्र ही तहसीलदार किंवा कंत्राटदार यांच्या मार्फत चालविण्यात येत असून येथे काम करणाऱ्या कर्मचारी यांना अतिशय अल्प मानधन मिळत असल्यामुळे सदर मानधन मध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याबाबतचा मुद्दा आमदार करण देवतळे यांनी तारांकित प्रश्न क्र ४१५२ लावून विधानसभेत शासनाचे लक्ष वेधले आहे . महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे आहेत तर ३६ जिल्ह्यात मिळून ३५८ तालुके आहेत , ३५८ तालुक्यातील सेतू केंद्रामध्ये १४०० ते १५०० कर्मचारी कार्यरत असून याचा लाभ संपूर्ण महाराष्ट्रातील सेतू ऑपरेटर ला होईल तर उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नावर शासन काय निर्णय घेईल यावर सेतू केंद्र ऑपरेटर चे लक्ष लागले असून येत्या पावसाळी अधिवेशनात सदर प्रश्न मार्गी लावावा अशी आशा सरकार व मा आमदार करण देवतळे यांच्या कडुन होत आहे.



जेसीबी, पोकलेन, ट्रॅक्टर मालक व चालकांना नादरपूर ग्रा.पं.चा इशारा

शासकीय रस्त्यावर चाऱ्या बुजवल्यास गुन्हा दाखल होणार

पिशोर । जावेद शेख

नादरपूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मातोश्री पानंद रस्त्याचे काम सुरू आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार सुरू असलेल्या या शासकीय कामात काही ठिकाणी जेसीबी, पोकलेन व ट्रॅक्टरच्या मदतीने चाऱ्या बुजवल्याचे निदर्शनास आले आहे.या प्रकरणी नादरपूर ग्रामपंचायतीने जाहीर सूचना देत स्पष्ट केले आहे की, ज्या ठिकाणी चाऱ्या बुजवण्यात आल्या आहेत, त्या ठिकाणी चाऱ्या पूर्ववत उकरून द्याव्यात. अन्यथा ग्रामपंचायत फिर्यादी होऊन संबंधितांवर पोलीस गुन्हा दाखल करण्यात येईल. पिशोर पोलीस ठाण्याने देखील यापूर्वी सूचना जारी करून शेतकऱ्यांच्या बांधांना किंवा शासकीय कामांना कोणताही धक्का लागू नये, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.



ग्रामपंचायतीने सर्व मशीन चालक व मालकांना आवाहन केले आहे की, शासकीय कामात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

वादळात सौरऊर्जेचे शेड उडाले; शेतकऱ्यावर संकट

चिचाळा (शास्त्री) येथील शेतकऱ्याचे हजारोंचे नुकसान; कंपनीकडून टाळाटाळ

चिमूर । शेषराव राऊत

चिमूर तालुक्यातील चिचाळा (शास्त्री) येथील शेतकरी प्रशांत कैलास सुखदेवे यांच्यावर निसर्गाच्या कोपामुळे आर्थिक संकट ओढावले आहे. अवघ्या चार महिन्यांपूर्वी विहिरीवर बसवलेले सौरऊर्जेचे पॅनल शेड जोरदार वादळामुळे उडून गेले. हे शेड विहिरीपासून जवळपास २० फूट दूर जाऊन कोसळले असून, सौर पॅनलचे तुकडे तुकडे झाले आहेत.सुखदेवे यांनी आपल्या शेतातील पिकांना ओलित देण्यासाठी सौरऊर्जेवर चालणाऱ्या मोटार पंपाची व्यवस्था केली होती. सध्या त्यांच्या शेतात धान, सोयाबीन, कपाशी आदी खरिपाची पिके आहेत. मात्र पावसाच्या उघडीनंतर सौरपंप बंद असल्याने या पिकांवर वाळण्याची वेळ आली आहे. परिणामी उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती आहे.

वादळामुळे परिसरातील अनेकांचे नुकसान झाले असले, तरी सुखदेवे यांचे नुकसान विशेष मोठे



असून, ऐन हंगामात मोटारपंप बंद झाल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत. त्यांनी ही तक्रार महावितरण व सोलर पॅनल बसवणाऱ्या सायरस कंपनीकडे केली असली, तरी कंपनीकडून दुरुस्तीला उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.प्रशांत सुखदेवे यांनी त्वरित शेड दुरुस्त करून सौरऊर्जेचा पुरवठा पूर्ववत करण्याची मागणी केली असून, यामुळेच आपल्या पिकांचे रक्षण होऊ शकते, अशी त्यांनी स्पष्टोक्ती केली आहे.

गांधी, नेहरू, फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार मानणारे सत्तेसाठी भाजपा सोबत जावू शकत नाहीत

हि कांग्रेसची विचारधारा नाही?–राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरदचंद्रजी पवार यांचें परखड वक्तव्य

मुंबई । विराम पवार

पिंपरी–चिंचवडच्या औद्योगिक विकासावर बोलताना पवार म्हणाले, रांजणगाव, चाकण, इंदापूरसारख्या ठिकाणी आम्ही औद्योगिक पट्टा तयार केला. यामागे गांधी–नेहरूंच्या विकासदृष्टिकोनाचा आधार होता. पूर्वी शेतीप्रधान असलेल्या या नगरीचं रूपांतर औद्योगिक शहरात झालं, यामागे अण्णासाहेब मगर, रामकृष्ण मोरे यांच्यासारख्या नेतृत्वाचा मोठा वाटा आहे, असं सांगतानाच त्यांनी पिंपरी चिंचवडचा इतिहास आणि बदलते राजकारणही उलगडलं.पिंपरी–चिंचवडमध्ये आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात शरद पवार यांनी एक भाष्य केले. त्या भाष्यावरून राजकारणात गदारोळ माजल्याचे चित्र आहे. सगळ्यांना बरोबर घ्यायचं, हे खरं; पण सगळे म्हणजे गांधी, नेहरू, फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार मानणारे. जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, त्यांना साथ देणं काँग्रेसचा विचार असू शकत नाही,असे परखड वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी केलं. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांच्या संभाव्य एकीच्या चर्चांना मोठा धक्का बसल्याचं बोललं जात आहे.

आपल्याला आता नव्या नेतृत्वाची फळी उभारायची आहे. बदल घडवायचा आहे, विकास करायचा आहे, जो भावी पिढीला प्रेरणा देईल. जे गेले त्यांची चिंता न करता संघटन मजबूत करा, असं आवाहन त्यांनी



कार्यकर्त्यांना केलं. मी अनेक प्रसंग पाहिले आहेत. माझ्यासोबतचे अनेक सहकारी गेले, पण कार्यकर्त्यांनी आणि जनतेने मला साथ दिली. त्यामुळे कोण येतं, कोण जातं, यापेक्षा जनतेचा विश्वास महत्वाचा आहे, असंही ते म्हणाले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्यकर्त्यांना दिलासा दिला आणि म्हणाले, तुम्ही निवडणुकीची चिंता करू नका. विचाराशी बांधिलकी ठेवणाऱ्यांबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील.राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या शहाणपणावर विश्वास व्यक्त करत शरद पवार म्हणाले, लोकशाही ही जनतेच्या शहाणपणामुळे टिकली आहे आणि टिकून राहील. फक्त आपल्याला विचारांचं राजकारण करायचं आहे. संधीसाधूपणाला थारा द्यायचा नाही.

यवतमाळ येथे काँग्रेसची निवडणूक आढावा बैठक उत्साहात संपन्न

यवतमाळ । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद अशा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ येथे काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. सिटीजन क्लब, मेडिकल चौक येथे पार पडलेल्या या बैठकीत पक्ष संघटन, बूथ लेव्हलवरील तयारी, कार्यकर्त्यांची भूमिका आणि स्थानिक प्रश्नांवर पक्षाची भुमिका यावर सखोल चर्चा झाली.

खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकीत काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी, सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे व प्रियंका गांधी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत सर्व



कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीसाठी सज्ज राहण्याचा निर्धार व्यक्त केला. ही बैठक संघटनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरली असून येत्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष अधिक बळकट होईल, असा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.या बैठकीला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री माणिकराव ठाकरे, माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी मंत्री वसंतराव पुरके, तसेच संजय ठाकरे, पी. बी. आडे, ॲड. जयसिंग चव्हाण, संतोष बोरले, अरूण राऊत, सिकंदर शाह, डॉ. बबलु देशमुख, आरीज बेग मिर्झा, महेंद्र कांबळे, स्वाती येंडे, शकील शेख, उषा दिवटे, वैशाली सवई, प्रमोद बागडे, समीना शेख, सीमा तेलंग, प्रमोदिनी रामटेके, प्रदीप वादाफळे, रवी ढोक, उत्तमराव खंदारे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीत विविध मतदारसंघांतील स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात आला. कार्यकर्त्यांनी जनतेच्या समस्या ऐकून घेऊन त्या मार्गी लावण्यावर भर द्यावा, असे आवाहन नेत्यांनी यावेळी केले.या बैठकीमुळे आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

आंतरराष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेसाठी वीरा वॉरियर्स ग्रुपच्या ८ खेळाडूंची निवड

वर्धा । प्रतिनिधी

मेजर ध्यानचंद क्रीडा संकुल, आमगाव येथे १४ व १५ जून २०२५ रोजी पार पडलेल्या केंद्र सरकार मान्यता प्राप्त फिट इंडिया तायक्वांडो चॅम्पियनशिप २०२५ मध्ये वीरा वॉरियर्स ग्रुपच्या २५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यापैकी आठ खेळाडूंनी सुवर्ण पदक पटकावत थेट थायलंडमधील पत्ताया सिटी येथे ८ ते १० ऑगस्ट २०२५ दरम्यान होणाऱ्या ८ व्या हेरोएस आंतरराष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.

सुवर्ण पदक विजेते खेळाडू – कशिश साहारे, तन्वी येल्लापुरे, यश चौधरी, खुशी कुमरे, सक्षम मोरे, साहिल तेलहांडे, ओम बोटरे आणि लक्की पांडे – यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाल्याने जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. त्याचबरोबर विशाल मडावी, सुजल बावणे, कोमल शिंदे, यश इंगळे, जानवी देवतळे, सुहानी नरवडे व निधी निकुरे यांनी रौप्य पदक मिळवले, तर मंथन महाकाळकर, गौरव राजुरकर, वेदिका सातपुते आणि निर्भय साखरकर यांनी कास्य पदक मिळवत आपले सामर्थ्य सिद्ध केले.स्पर्धेतील या घवघवीत यशामुळे तायक्वांडो स्पोर्ट असोसिएशन ऑफ वर्धाचे सचिव शाम खेमस्कर आणि वीरा वॉरियर्स ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रोहित राऊत यांनी खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंनी त्यांच्या यशाचे श्रेय आई–वडील तसेच प्रशिक्षक गौरव खिराळे आणि हर्ष मून यांना दिले. रोहित खैरकार यांनी या स्पर्धेत पंच म्हणून काम पाहिले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कशिश खैरे, संकेत नगराळे, मयूर नगराळे, रुचिका वानखेडे, छकुली पिसे, अदिती गायकवाड, आस्था खैरे, तनश्री धनफोले, लक्ष्मी धानफोले आणि इतर पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ही कामगिरी खेळाडूंच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि संघटनेच्या परिश्रमांचे प्रतिक ठरली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरी -च्या चाव्या कोणाच्या हाती...!

मुंबई महानगरपालिका निवडणुका लवकरच होण्याची शक्यता आहे. त्या कधी होणार याची स्पष्टता अद्याप नसली तरी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास मंजुरी दिली होती. या निवडणुकीत ठाकरेंची शिवसेना आणि शिंदेंची शिवसेना, मनसे, काँग्रेस सर्वच पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे, शिवाय केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या भाजपचीही प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.महाविकास आघाडीत या निवडणुकीसाठी एकत्र निवडणुका लढवण्यासंदर्भात अद्याप एकमत झालेले दिसत नाही. त्यामुळे ठाकरेंची शिवसेना ही निवडणूक स्वबळावर लढवण्याची शक्यता आहे. महायुतीमध्ये देखील ही निवडणूक एकत्र लढवण्यासंदर्भात अद्याप एकमत झालेले नाही. या अनुषंगाने राजकीय पातळीवर घडत असलेल्या घडामोडी पाहता भाजप देखील स्वबळावर लढणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे.आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने एक सर्वेक्षण केले आहे. भाजपने मुंबईत अधिक जागा लढल्यास त्याचा थेट फायदा होईल, असे या सर्वेक्षणातून भाजपला कळाल्याचे सूत्रांनी दिलेल्या माहितीतून समजते.राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन जरी निवडणूक लढवली तरी भाजपच्या जागांवर फारसा परिणाम होणार नाही, असेही सर्वेक्षणातून भाजपला दिसून आले असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे भाजप ही स्वबळावर लढायचे का याची चाचपणी आतापासूनच करत आहे. त्या दृष्टीने तयारीही सुरू झाली आहे.मुंबईत १९७० च्या दशकापासून महापालिकेवर शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, शिवसेनेच्या संख्याबळात घट होत राहिली. पालिकेत शिवसेना–भाजप युती अनेक वर्षांपासून राहिली असली तरी भाजपच शिवसेनेचा मोठा प्रतिस्पर्धी ठरला आहे.पालिकेवर एकहाती वर्चस्व मिळवण्यासाठी दोन्ही पक्ष २०१७ मध्ये स्वतंत्र लढले. त्यात शिवसेनेने ८४ तर भाजपने ८२ जागा जिंकल्या. २०१२च्या तुलनेत भाजपच्या जागांमध्ये जवळपास दीडपट भर पडली. तेव्हापासूनच भाजप मुंबई महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिला आहे. गेल्या काही वर्षांतील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची मुंबईतील मतांची टक्केवारी सातत्याने वाढत आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही भाजपने मुंबईतील आपली ताकद दाखवून दिली. मात्र, त्याच्याही आधीपासून भाजपने मुंबई महापालिकेत दीडशे जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. विधानसभा निवडणुकीतील अद्भुत यशानंतर भाजपचे मुंबईतील नेते महापालिकेत २०० पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा दावा करू लागले आहेत.





विराम पवार (मुंबई)

मुंबई महापालिकेवर तब्बल २५ वर्षे सत्ता गाजवलेल्या एकसंध शिवसेनेची दोन शकले पडली – एकनाथ शिंदे यांची 'बाळासाहेबांची शिवसेना' आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे). त्यानंतर शिंदे गटाकडून फोडाफोडीचे राजकारण जोरात सुरू झाले. गेल्या तीन वर्षांत ठाकरे यांच्या गटातून एकेक करीत तब्बल निम्मे नगरसेवक शिंदे यांच्या शिवसेनेत गेले. ठाकरे यांच्या पक्षाला लागलेली गळती थांबत नाही, तर शिंदे यांच्या पक्षात रोज नवनवीन प्रवेश होत आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून या निवडणुकीत शिवसेनेच्या या दोन्ही गटांची कसोटी लागणार आहे.शिवसेना हा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचा राजकीय पक्ष असून शिवसेनेची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांनी १९६६ मध्ये केली. मुंबईमध्ये मराठी माणसावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी शिवसेनेची स्थापना झाली होती. शिवसेनेतून गेल्या काही वर्षात दोन मोठे नेते बाहेर पडले. २००५ मध्ये आधी नारायण राणे यांनी शिवसेना सोडली आणि त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांचे पुतणे राज ठाकरे यांनीही २००६ मध्ये शिवसेना सोडून स्वतःचा पक्ष स्थापन केला. या दोन्ही नेत्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर आरोप करीत शिवसेना सोडली. मात्र, शिवसेनेवर त्यांनी दावा केला नव्हता.आधीच्या दोन नेत्यांनी पक्ष सोडला तेव्हा शिवसेनेचे जेवढे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक नुकसान शिंदे यांच्या बंडखोरीनंतर झाले. शिंदे यांच्या बंडखोरीनंतर शिवसेनेत उभी फूट पडली. खरी शिवसेना कोणाची हा प्रश्न उभा राहिला आणि हा वाद न्यायालयापर्यंत पोहोचला. शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह दोन्ही एकनाथ शिंदे यांना मिळाले. मात्र २०२२ पासून शिवसेनेची ही दोन शकले राज्याच्या राजकारणात चर्चेत आहेत.शिवसेना पक्षाचे दोन गट झाले तेव्हा सुरुवातीला मुंबईत शिवसेनेला अजिबात फटका बसला नसल्याचे चित्र होते. मुंबईत ठाकरेंचीच सत्ता असे चित्र दिसत होते. मात्र गेल्या तीन वर्षांत हे चित्र पालटण्यात एकनाथ शिंदे यांना यश आले आहे. शिंदे यांच्या बंडखोरीविरुद्ध मुंबईतील माजी नगरसेवकांमध्ये, शिवसैनिकांमध्ये जो राग होता त्याची धार गेल्या तीन वर्षांत बोथट झाली आहे. आधीच उद्धव ठाकरे यांच्या पक्षात नाराज शिवसैनिकांची मोठी फौज आहे. काही जण सत्ता नाही म्हणून नाराज आहेत. या नाराजांच्या तक्रारी सोडवण्यात ठाकरे अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. एकाची नाराजी दूर केली तरी दुसरा कोणी तरी नाराज होणार हे ठरलेले आहे. त्यामुळे ठाकरे यांची अवस्था धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय, अशी झाली आहे. त्यामुळे नाराजी जाहीर करून एकामागोमाग एक माजी नगरसेवक पक्षातून बाहेर पडत आहेत.शिवसेनेत दोन तट पडल्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यांनी मुंबईत विविध कामे करण्याचा सपाटा लावला. विधानसभा निवडणुकीत शिंदे गटाला मोठे यश मिळाले. त्यामुळे शिंदे गटाची लोकप्रियता आणि ताकद वाढली. सत्तेच्या वर्तुळाशी जवळीक असो, आर्थिक गणिते असो किंवा जिंकून येण्याची खात्री असो, इच्छुक उमेदवारांना शिंदे यांचा पक्ष अधिक जवळचा वाटू लागला आहे. महापालिकेत उद्धव ठाकरे गटाला पुन्हा सत्ता मिळण्याची शक्यता नाही, अशी बहुतेकांची समजूत झाली आहे.तसेच शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळापासून असलेल्या काही कार्यकर्त्यांना आतापर्यंत कधीच संधी मिळाली नाही, त्यांना एकदा तरी निवडणूक लढवायची आहे. त्यात भरीस भर म्हणून शिंदे यांच्या पक्षात गेलेले माजी नगरसेवक आणखी इतर माजी नगरसेवकांनाही आपल्या पाठोपाठ आणू लागले. त्यामुळे शिंदे गटाकडे रीघ लागल्याचे चित्र आहे. त्यात सर्वाधिक माजी नगरसेवक अर्थातच उद्धव ठाकरे गटाचे आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेत महापालिका निवडणूक लढवण्यासाठी आयते उमेदवार मिळत आहेत.उद्धव ठाकरे यांच्या गटाचे एकेक माजी नगरसेवक शिंदे यांच्या पक्षात जात असून आदल्या दिवशी पक्षाच्या बैठकीत असलेले माजी नगरसेवक, पदाधिकारी दुसऱ्या दिवशी दुसऱ्या गटात गेलेले दिसतात. त्यामुळे आता आश्चर्याचा धक्काही बसणे बंद झाले आहे. ठाकरे यांचा पक्ष रिकामा करण्याचा पण शिंदे यांनी केल्याची चर्चा आहे. भविष्यात अनेकांच्या पक्ष प्रवेशांची यादीही ठरल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे कोणालाही अडवत नाहीत. त्यामुळे जिंकण्याची खात्री नसलेले अनेक जण पक्ष सोडून जात आहेत.ठाकरे यांच्या पक्षात आपसात वाद असलेले अनेक जण आता शिंदे यांच्याकडे गेले आहेत. त्यामुळे तिकीट वाटपाच्या वेळी तिथेही वादावादी होणारच यात शंका नाही.गेल्या पंचवीस ते तीस वर्षांपासून एकसंध शिवसेनेची मुंबई महापालिकेवर सत्ता होती. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून अंदाजे ७०,००० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असलेली मुंबई महापालिका देशातली सर्वात श्रीमंत महानगरपालिका आहे. हजारो कोटींची कंत्राटे तिच्या माध्यमातून निघतात. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या आपल्या हाती हव्या, असे सर्वच पक्षांना वाटते.उद्धव ठाकरेंसाठी मुंबई महानगरपालिका ही शेवटची संधी आहेपालिकेच्या प्रत्येक निवडणुकीत मुंबईतील मराठी माणसांनी नेहमीच शिवसेनेला साथ दिली. महापालिकेच्या या सत्तेच्या माध्यमातून शिवसेनेचीही मुंबईवरील पकड मजबूत होत गेली आणि शिवसेनेला आर्थिक रसदही मिळत गेली. मात्र आता शिवसेनेत दोन गट पडल्यामुळे शिवसेनेची सत्ता राहणार का, हाच मूळ प्रश्न आहे.उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला लोकसभा निवडणुकीत राज्यात चमकदार यश मिळाले. परंतु विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांच्या पक्षाला अव्हेरले. तरी मुंबईत त्यांचे २० पैकी १० आमदार निवडून आले. शिवाय पक्षातही मोठी पडझड झाली. आता पक्ष टिकवायचा तर महापालिका निवडणुकीत त्यांना घवघवीत यश मिळवण्याशिवाय पर्याय नाही. म्हणूनच उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही शेवटची संधी आहे, असे म्हटले जात आहे.उद्धव ठाकरेंसमोर आव्हाने भरपूर आहेत. विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाने लढलेल्या ९४ पैकी केवळ २० जागा जिंकल्या. त्यातील दहा जागा फक्त मुंबईतील आहेत. ही बाब उद्धव ठाकरेंसाठी सुखावह असली तरी, जिंकलेल्या जागांपैकी काही जागा त्यांनी कमी मताधिक्याने जिंकल्या आहेत. २०१९च्या तुलनेत ठाकरेंच्या उमेदवारांचे मताधिक्य घटल्याचे स्पष्ट होत आहे. ही निवडणूक या दोन पक्षांसाठी कसोटीची असेलच, पण या निवडणुकीच्या निकालावरच पुढची वाटचाल अवलंबून असेल हेदेखील तितकेच खरे.महापालिका निवडणुकीसाठी भाजपने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्या काही वर्षांतील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची मुंबईतील मतांची टक्केवारी सातत्याने वाढत आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही भाजपने आपली ताकद दाखवली. मात्र त्याच्याही आधीपासून भाजपने मुंबई महापालिकेत दीडशे जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र विधानसभेत महायुतीने घवघवीत यश मिळवून २८८ पैकी २३० जागा जिंकल्या. पण त्यातही भारतीय जनता पक्षाने राज्याच्या इतिहासातील अभूतपूर्व अशी कामगिरी करत १३२ जागांवर विजय मिळवला. महाराष्ट्रात स्वबळावर एकहाती सत्ता मिळवण्याची भाजपची महत्त्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. ती यंदा काहीशी अपुरी पडली असली तरी मुंबई महापालिकेवर पर्यायाने मुंबईवर एकहाती वर्चस्व राखण्याचे ध्येय भाजपला खुणावू लागले आहे.काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस ह्या दोघांनी युती करून लढले तरच काही जागा जिंकून आणू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका समीकरण बदलू शकते? राज ठाकरे कोणा सोबत की एकला चलो रे यांची भूमिका कितपत महत्त्वाची?विधानसभा निवडणुकीत मनसेला राज्यभरात एकही जागा जिंकता आली नाही. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना पहिल्याच निवडणुकीत माहीममधून पराभव स्वीकारावा लागला. शिवाय ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले. मुंबईत अन्यत्रही मनसेचे उमेदवार प्रभाव पाडू शकले नाहीत. मात्र, मनसेच्या उमेदवारांचा फायदा ठाकरे गटाला झाल्याचे दिसून आले. राज ठाकरे यांनी निवडणुकीत महाविकास आघाडीला प्रामुख्याने लक्ष्य केले. त्यांची भूमिका महायुतीला अनुकूल राहिली. मात्र, वरळी, माहीम, जोगेश्वरी पूर्व, विक्रोळी, दिंडोशी, वर्सोवा, कलिना याठिकाणी मनसेच्या उमेदवारांमुळे महायुतीच्या उमेदवारांना फटका बसल्याचे पाहायला मिळाले. आता महापालिका निवडणुकीत मनसे काय भूमिका घेते, यावर मुंबईतील राजकीय समीकरणे बदलू शकतात.

महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाच्या राज्य युवा उपाध्यक्ष पदी मकरंद चिनके यांची निवड

गंगाखेड । प्रतिनिधी

गंगाखेड येथील कोष्टी समाजाचे युवा समाजसेवक मकरंद दगडू चिनके यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांची महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळ, मुंबई अंतर्गत राज्य युवा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत राज्य युवा संघटनेची पुनर्रचना करण्यात आली असून, या पुनर्रचनेत संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव सातपुते, महिला अध्यक्षा सुषमा दौंडे यांच्या आदेशाने राज्य युवा अध्यक्ष राजेश सपाटे यांनी मकरंद चिनके यांची निवड जाहीर केली. त्यांना अधिकृत निवडीचे पत्र देखील प्रदान करण्यात आले आहे.



धागा धागा अखंड विनूया, कोष्टी समाज सारा एक करूया या ब्रीदवाक्याला अनुसरून महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाचे कार्य सुरू असून, हेच ब्रीदवाक्य पुढे घेऊन समाजहितासाठी कार्य करत राहणार असल्याचे नवनियुक्त राज्य युवा उपाध्यक्ष मकरंद चिनके यांनी निवडीनंतर सांगितले.त्यांच्या या निवडीबद्दल समाजातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार आणि कोष्टी समाजाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

परिवहन विभागाच्या पथकाची कारवाई

प्रमाणापेक्षा जास्त वजन असलेला हायवा जप्त

पिशोर । जावेद शेख

प्रादेशिक परिवहन विभागाच्या पथकाने साखरवेल (ता. कन्नड) गावाजवळ खडीने भरलेला एक हायवा पकडत ३४,५०० रुपये दंड आकारला. या हायवामध्ये प्रमाणित वजनापेक्षा अधिक खडी आढळून आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे यांच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथक हे विशेष मोहीम राबवत होते. या पथकात मोटार वाहन निरीक्षक विलास वडितके, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवाजी पुंगळे, मकरंद जायभाये व वाहनचालक गजानन फड यांचा समावेश होता.



या मोहिमेअंतर्गत स्कूल बस योग्यता प्रमाणपत्र, परवाना नूतनीकरण, विधिग्राह्य कागदपत्रे, तसेच वाहनांचे अतिभार तपासणी केली जात होती. दरम्यान, पिशोर-सिल्लोड मार्गावर साखरवेल गावाजवळ एम.एच. २० ई.जी. ६७९७ या क्रमांकाच्या हायवामध्ये प्रमाणापेक्षा अधिक खडी आढळून आली.संबंधित वाहन पिशोर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. वाहन मालकाने ३४,५०० रुपये दंड भरला असून, इतर कारवायांसह एकूण १,३५,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती निरीक्षक वडितके यांनी दिली.

अतिभार वाहतुकीमुळे रस्त्यांचे नुकसान–नागरिकांमध्ये संताप

पिशोर परिसरात व त्याभोवतालच्या ग्रामीण भागात हायवा, ट्रॅक्टर व ट्रकच्या माध्यमातून प्रमाणापेक्षा अधिक वजन वाहून नेण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्तेही मोठ्या प्रमाणात खराब झाले आहेत.फक्त एखाद–दोन वाहनांवर कारवाई करून जरब बसणार नाही, यासाठी सातत्याने कठोर कारवाई आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया जागृत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सातबारा कोरा केव्हा होणार?

राष्ट्रीय समाज पक्षाचा सरकारला जाब–अंगद देवकते यांचा सवाल

सोलापूर । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार म्हणणारे आता बिळात लपले आहेत का? असा थेट सवाल राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी उपस्थित केला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापही मदत न मिळाल्यामुळे त्यांनी शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत भाजप सरकारवर जोरदार हल्ला चढवला.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दिवसेंदिवस घटत असताना, केंद्र सरकारच्या अहवालानुसार शेतमजुरांचे उत्पन्न शेतकऱ्यांपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे. यामुळे शेती ही तोट्याचा व्यवहार बनली असून, खतं, बियाणं, मजुरी व औषधांच्या महागाईमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या शासकीय आकडेवारीचा दाखला देत देवकते यांनी राज्य सरकारच्या चुकीच्या शेतीधोरणांवर बोट ठेवले.



निवडणुकीआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु आता त्यांचं लक्षच कर्जमाफीकडे नसल्याची टीका देवकते यांनी केली. सत्तेची मस्ती चढलेल्यांनी शेतकऱ्यांचे दुःख विसरले, असे म्हणत त्यांनी भाजप सरकारवर सडकून टीका केली.करमाळा तालुक्यात अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले असतानाही सरकारकडून नुकसानग्रस्तांना अद्यापही मदत न मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. सर्व पंचनामे पूर्ण होऊनही मदतीचा निधी पोहोचलेला नसल्याने त्यांनी शासनाच्या उदासीनतेवर सवाल उपस्थित केला.या पार्श्वभूमीवर करमाळ्याचे नायब तहसीलदार विजय लोकरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी देवकते यांच्यासह रासपचे बाळासाहेब टकले, जगन्नाथ सलगर, नामदेव पालवे, शिवाजी खटके, विकास मेरगळ, सुधीर ठोंबरे, सुनील बंडगर, रघुनाथ खटके, यशवंत सलगर, शंकर सुळ, दीपक कडू आदी पदाधिकारी उपस्थित होते.शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाविरोधात आवाज उठवत राहू. जर लवकरात लवकर कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्यात आला नाही आणि अतिवृष्टीग्रस्तांना आर्थिक मदत दिली नाही, तर राष्ट्रीय समाज पक्ष रस्त्यावर उतरेल,असा इशारा यावेळी अंगद देवकते यांनी दिला.

सेंटर फर्स्ट सलोनी वरघने हिचा भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या हस्ते सत्कार



हिंगणघाट । प्रतिनिधी

दिग्रस येथील शेतकरी कुटुंबातील सुकन्या सलोनी राजेशवर वरघने हिने बारावी परीक्षेत ८० टक्के गुण मिळवत संपूर्ण सिंधी सेंटरमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री. संजय गाते यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देत तिचा सत्कार करण्यात आला. प्रगती विद्यालयात शिक्षण घेणारी सलोनी ही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील अभ्यासात सातत्य ठेवत यशाच्या शिखरावर पोहोचली आहे. सत्कार समारंभ मा. आमदार समीरभाऊ कुणावार यांच्या कार्यालयात संपन्न झाला. यावेळी आमदार समीरभाऊ कुणावार यांनी सलोनीच्या पुढील शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले.सलोनीला आर्किटेक्ट होण्याची इच्छा आहे. सध्या ती मुंबईतील विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी प्रयत्नशील आहे. खेड्यातील मुलगी शिक्षणाच्या बळावर स्वप्न उराशी बाळगून पुढे वाटचाल करत असल्याबद्दल ग्रामविकास सहसंयोजक धीरज लेंडे यांनी तिचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सर्वतोपरी मदतीचे आश्वासनही दिले.सलोनीच्या या यशात तिच्या आई-वडिलांचा मोलाचा वाटा असून त्यांचेही यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

हिंगणघाट येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भव्य योग व आरोग्य शिबिरास प्रारंभ

मन,मस्तिष्क आणि मनगट मजबूत करण्यासाठी योग व प्राणायाम अत्यावश्यक-संजय गाते

हिंगणघाट । प्रतिनिधी

पतंजली योग परिवार हिंगणघाट आणि अभिनव विचार मंच हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून निखाडे मंगल कार्यालय, हिंगणघाट येथे भव्य निशुल्क योग शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा प्रथम दिवस १७ जून रोजी उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. नागरिकांचा या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या योग शिबिराचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे आणि अभिनव विचार मंचाचे उपाध्यक्ष चंद्रशेखर रेवतकर हे मान्यवर सुद्धा मंचावर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना संजय गाते यांनी सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात मन, मस्तिष्क आणि मनगट यांना बळकट ठेवण्यासाठी योग व प्राणायाम अत्यावश्यक आहेत. योगामुळे मानसिक स्थैर्य, शारीरिक आरोग्य आणि आत्मिक शांती प्राप्त होते. त्यामुळे आजारांपासून दूर राहण्यासाठी आणि समाजाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यासाठी प्रत्येकाने दररोज योग करावा.

कार्यक्रमात किशोर दिघे यांनीही आपल्या मनोगतातून योगाचे वैयक्तिक व सामाजिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. युवकांनी आणि महिलांनी याचा नियमित सराव करावा, हेच खरे आरोग्य विमा आहे. या शिबिराच्या विशेष कार्यक्रमात अभिनव विचार मंचाचे शिलेदार योग शिक्षक प्रभाकर कोळसे यांचे सुपुत्र वेदांत कोळसे



यांनी णझडउ परीक्षा उत्तीर्ण करून भारतीय सैन्यामध्ये लेफ्टनंट पदावर निवड झाल्याने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या गौरव सोहळ्यात उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात वेदांतचे अभिनंदन केले. त्यांच्या यशामुळे संपूर्ण योग समुदायात आनंदाचे व प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले.या शिबिरात योग शिक्षक पौर्णिमा धात्रक यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या प्रोटोकॉलनुसार विविध योगासने, प्राणायाम, योगीक जॉगिंग इत्यादींचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी योगाभ्यास कसा करावा, कोणत्या आसनांचे आरोग्यावर काय परिणाम होतात, याबाबत सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन सुकळकर (अध्यक्ष, अभिनव विचार मंच) यांनी तर आभार प्रदर्शन विजय धात्रक (योग शिक्षक) यांनी केले.या योग शिबिरात हनुमान मंदिर योग कक्षा, साई मंदिर योग कक्षा, पटवारी कॉलनी योग कक्षा, शिवराई गार्डन योग कक्षा, बिडकर वार्ड योग कक्षा, निखाडे भवन योग कक्षा यांसारख्या विविध केंद्रांतील योग शिक्षक, साधक व साधिका यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.हा उपक्रम २१ जून पर्यंत चालणार असून नागरिकांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमामुळे हिंगणघाट शहरात योगाची चळवळ अधिक व्यापक होत असून, समाजाच्या आरोग्यप्रती सजगतेत वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे.

शालेय साहित्य महागले पालकांच्या खिशावर आर्थिक ताण

धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाला काही दिवसच उरले असताना शालेय साहित्यांच्या वाढत्या किमतींमुळे पालकांवर आर्थिक भार वाढणार आहे. १६ जूनपासून सीबीएसई शाळा तर २३ जूनपासून राज्यातील शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित शाळा सुरू होत आहेत. मात्र यंदा शालेय साहित्य खरेदी करताना पालकांची दमछाक होणार आहे.

गेल्या वर्षी ३५० ते ४०० रुपये दरम्यान मिळणारा वह्यांचा संच यंदा ५०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. तसेच, फॅशनेबल शालेय दप्तरांची (स्कूल बॅग) किंमत लक्षणीय वाढली आहे. ५० ते ८० रुपयांत मिळणाऱ्या पाण्याच्या बाटल्या आता १५० रुपयांपर्यंत विकल्या जात आहेत.

वाहतूक खर्चात व कच्च्या कागदाच्या दरात वाढ झाल्याने शालेय साहित्य महागले असल्याचे विक्रेते सांगतात. यामुळे एकूण



शैक्षणिक साहित्याच्या किमतीत ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे निरीक्षण आहे. दरम्यान, बाजारात नवनवीन नोटबुक्स, कॉम्पास पेट्या, नोटपॅड, अंकलपी, लहान मुलांच्या पट्ट्या, विविध प्रकारची पेन, आकर्षक दप्तरे व मुलांच्या व्यक्तिमत्त्वविकासाशी संबंधित साहित्य विक्रीस आले आहे. मुलांना आवडणाऱ्या वस्तूंमध्येही महागाईची झळ बसली आहे.ग्रामीण भागातील आठवडी बाजारांमध्येही शालेय साहित्याची विक्री सुरू असून पालकांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे. अनेक नामांकित कंपन्यांमधील स्पर्धेमुळे दर्जेदार साहित्य उपलब्ध असले तरी वाढलेल्या किमती ग्राहकांच्या खिशाला चटका लावणाऱ्या आहेत.शाळांकडून शैक्षणिक पुस्तके मोफत दिली जात असली तरी वह्या, इतर साहित्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंमुळे पालकांवरील आर्थिक ताण निश्चितच वाढलेला आहे.

उमरखेडमधील हल्ला प्रकरणातील आठही फरार आरोपी अटकेत

स्थानिक गुन्हे शाखा व उमरखेड पोलिसांची संयुक्त कारवाई

उमरखेड । प्रतिनिधी

शेख आरिफ शेख निसार आणि त्यांच्या भावावर झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणातील सर्व आठही फरार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ व उमरखेड पोलिस स्टेशनच्या संयुक्त पथकाने अटक केली आहे. ही कारवाई नागपूर-नांदेड महामार्गावरील ढाणकीकडे जाणाऱ्या पुलाजवळ १७ जून रोजी करण्यात आली.

दिनांक ८ जून रोजी आठवडी बाजार परिसरात हातात तलवार, लाठी-काठ्या घेऊन दहाच्या वर लोकांनी केलेल्या हल्ल्यात फिर्यादी आणि त्यांचा भाऊ गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, आरोपींमध्ये परवेज खान ऊर्फ लाला, शेख तैमीर ऊर्फ समीर शेख, शेख आझीम ऊर्फ इचोडा, शेख ईब्राहीम ऊर्फ



इरफान, शेख मुजाहीद ऊर्फ मुज्जू शहा, सय्यद आरिफ सय्यद युसूफ, एफौज्जोदीन ऊर्फ गौसू आणि शेख मोबीन ऊर्फ मुन्ना यांचा समावेश आहे.पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानीय गुन्हे शाखा) व शंकर पांचाळ (उमरखेड पोलीस स्टेशन) यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले होते. या पथकांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून सात आरोपींना घटनास्थळावरून ताब्यात घेतले. उर्वरित एक आरोपीला त्याच्या राहत्या घरी अटक करण्यात आली.

सर्व आरोपींनी प्राथमिक चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली आहे. या गुन्ह्याच्या तपासाला गती मिळाल्यामुळे उमरखेड परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या या जलद आणि अचूक कारवाईचे कौतुक केले आहे.

शेतकऱ्यांवर सोलर पंपाची सक्ती अन्याय कारक-विद्युत कनेक्शन तात्काळ द्या!

किसान अधिकार अभियानची शासनाकडे जोरदार मागणी

वर्धा । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ११९० विहीरधारक शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीपंपासाठी महावितरणकडे अर्ज केलेले असूनही, २०२१ पासून आजतागायत अनेकांना विद्युत कनेक्शन मिळालेले नाही. याउलट महावितरणकडून आता या शेतकऱ्यांना सोलर पंप घेण्याची सक्ती करण्यात येत असून डिमांड अर्जांचे शुल्क (चेक) परत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सक्तीला विरोध करत किसान अधिकार अभियान या शेतकरी संघटनेने तीव्र संताप व्यक्त करत शासनाकडे ठोस मागण्या मांडल्या आहेत.सोलर पंप हे महागडे असून त्यातून मिळणारा पाण्याचा दाब अपुरा असल्यामुळे ओलितासाठी ते पुरेसे नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी, अनेकांची शेती



रखडली असून पाण्याअभावी पीक उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे या पद्धतीची सक्ती अन्यायकारक असल्याचे स्पष्ट करत किसान अधिकार अभियान ने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे:

१. २०२१ ते २०२५ या कालावधीत पारंपरिक विद्युत कनेक्शनसाठी केलेल्या सर्व अर्जांना तात्काळ मंजुरी द्यावी.

२. शेतकऱ्यांवर सोलर पंप घेण्याची सक्ती थांबवावी.

३. ११९० विहीरधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने विद्युत जोडणी द्यावी.

४. २०२१ पासून पाण्याअभावी झालेले पीक नुकसान लक्षात घेता योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी.

किसान अधिकार अभियानचे संघटक गोपाल दुधाने यांनी सांगितले की, महावितरण आणि शासनाने जर लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन तीव्र करण्यात येईल. या मागण्यांसाठी प्रमुख पदाधिकारी अविनाश काकडे, सुदाम पवार, प्रफुल कुकडे, प्रा. प्रवीण भोयर, शशिकांत विरखेडे, चेतन कापसे, अमोल ठाकरे, नितेश बोरकर आदी कार्यकर्ते प्रयत्नशील असून, लवकरच जिल्हाधिकारी व मंत्रालय स्तरावर निवेदन देण्यात येणार आहे.

पाडळीतील जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव थाटात साजरा



सोलापूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रारंभ आनंदमय आणि उत्साही वातावरणात झाला. पहिली वर्गात नव्याने दाखल होणाऱ्या चिमुकल्यांचे फेटा बांधून, फुगे देऊन व औक्षण करून भरगच्च स्वागत करण्यात आले.

या निमित्ताने संपूर्ण गावातून विद्यार्थ्यांची देशभक्तिपर गीतांनी सजलेली प्रभातफेरी व ट्रॅक्टर मिरवणूक काढण्यात आली. महाराष्ट्र गीतांच्या गजरात गावकऱ्यांचे लक्ष या अनोख्या उपक्रमाकडे वेधले गेले. मिरवणुकीत गावातील ग्रामस्थांसह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, तसेच विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.मिरवणुकीनंतर विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी केले होते. गावातील नागरिकांनी शाळेतील शिक्षकवृंद व आयोजकांचे विशेष कौतुक केले.कार्यक्रमाचे कौतुक करताना करमाळा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्ताराधिकारी नितीन कदम, मिनिनाथ टकले, तसेच केंद्रप्रमुख निशांत खारगे यांनी उपस्थित शिक्षक व ग्रामस्थांचे अभिनंदन केले.

स्वातंत्र्य सेनानींच्या दरमहा २० हजार रूपये सन्मान निधीला कॅबिनेटची मंजुरी-आ.मुनगंटीवारांनी विधानसभेत वेधले होते लक्ष

४ हजार १०३ लोकतंत्र सेनानींना न्याय मिळवून दिल्याबद्दल आ.मुनगंटीवार यांचे मानले आभार

राजस्थान सरकारच्या धर्तीवर मानधन वाढविण्याची मुख्यमंत्र्याकडे केली होती मागणी

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

विधानसभेत लक्षवेधी वर मांडली चर्चा

विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून आ. मुनगंटीवार यांनी चर्चा सुरू केली. त्यानंतर चर्चेत विविध मतदारसंघांच्या आमदारांनी सहभागी होणे तसेच हा मुद्दा सरकारच्या लक्षात आणून देणे, हे केवळ आ.मुनगंटीवार यांच्यामुळे शक्य झाले होते. तसेच आ. मुनगंटीवार यांनी दिलेल्या निवेदनावर कार्यवाही करण्याचे आदेश देखील मुख्यमंत्र्यांनी दिले होते, हे विशेष.

चंद्रपूर । प्रतिनिधी

आणीबाणीच्या काळात कुटुंबाचा आणि स्वतःचा जराही विचार न करता केवळ राष्ट्र सर्वोपरी म्हणून देशासाठी कारावास भोगून संघर्ष करणाऱ्या लोकतंत्र सेनानींना दरमहा २० हजार रुपये सन्मान निधी मिळावा, यासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून आवाज बुलंद केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदनाच्या माध्यमातून मागणी केली होती. आज राज्याच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळेच हे शक्य झाले, या शब्दांत लोकतंत्र सेनानींनी त्यांचे आभार मानले आहेत. एका अत्यंत संवेदनशील विषयामध्ये स्वतः लक्ष घालून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर ४ हजार १०३ लोकतंत्र सेनानींना न्याय मिळाला आहे. त्यामुळे आ. मुनगंटीवार यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहेत. कॅबिनेटने दिलेल्या मंजुरीनुसार, एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीतील सेनानींना मासिक २० रुपये व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीला किंवा पतीला १० हजार रुपये इतके मानधन देण्यात येईल. तसेच एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीतील सेनानींना मासिक १० हजार रुपये तर त्यांच्या पश्चात त्यांच्या



पत्नीला किंवा पतीला ५ हजार रुपये इतके मानधन देण्यास कॅबिनेटने मंजुरी दिली आहे.लोकतंत्र सेनानींना मानधन मिळण्यात व इतर प्रशासकीय बाबींमध्ये येत असलेल्या अडचणींचे निवेदन आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले होते. विषयाची दखल घेऊन सरकारदरबारी पोहोचविल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. मंगळवार, दि. १७ जूनला कॅबिनेटची मंजुरी मिळाल्यामुळे या प्रयत्नांना यश आलं आहे. लोकतंत्र सेनानी संघाचे (जालना, परतूर) कार्याध्यक्ष रघुनाथ दीक्षित, महासचिव विश्वास कुलकर्णी (जळगाव), प्रदीप ओगले (सांगली), अरुण भिसे (यवतमाळ), पांडुरंग जिंजुर्डे (यवतमाळ) आणि यादवराव गहूकार (यवतमाळ) , श्रीकांत शिंदे (सांगली) यांनी आ.सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेत यासंदर्भातील निवेदन दिले होते.

राजस्थान सरकारचा दिला होता दाखला

लोकतंत्र सेनानींच्या सन्मान निधित भरीव वाढ करण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली होती. आ. मुनगंटीवार यांनी निवेदनामध्ये राजस्थान सरकारच्या निर्णयाचा दाखला दिला होता. राजस्थान सरकारने लोकतंत्र सेनानी सन्मान म्हणून पेन्शन राशी २० हजार रुपये केली आहे. तसेच आरोग्य चिकित्सा सहाय्य म्हणून ४ हजार रुपयांची राशी दर महिन्याला तेथे दिली जाते. महाराष्ट्रात सध्यस्थितीत ४ हजार १०३ स्वातंत्र्य सेनानी सन्मान निधीस पात्र आहेत. राजस्थान सरकारची अधिसूचना लक्षात घेऊन महाराष्ट्रात देखील हा सन्मान निधी वाढवावा, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

वरोरा–भद्रावतीत शिंदे गटाचा झेंडा फडकणार

शेकडो कार्यकर्त्यांचा एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात शक्तीप्रदर्शन; माजी नगरसेवक,सरपंच,उपसरपंच,सदस्य,युवासैनिक,महिला कार्यकर्त्यांचा समावेश









मुंबई (प्रतिनिधी): वरोरा–भद्रावती विधानसभा क्षेत्रात शिवसेना (शिंदे गट) आता अधिक ताकदीने उदयास येताना दिसत आहे. लोकसभा संघटक मुकेश मनोजराव जिवतोडे यांच्या प्रयत्नातून आणि नेतृत्वाखाली आज१७ जून रोज मंगळवारला मुंबई येथे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते मोठा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या प्रवेशामुळे वरोरा–भद्रावतीतील राजकीय समीकरणांना नव्या दिशा मिळण्याची शक्यता असून, शिंदे गटाच्या संघटनात्मक बळात मोठी भर पडली आहे.या भव्य प्रवेश सोहळ्यात वरोरा व भद्रावती नगर परिषदांतील माजी नगरसेवक, विविध ग्रामपंचायतीतील सरपंच–उपसरपंच, सदस्य, बाजार समितीचे माजी संचालक, महिला व युवक शिवसैनिक यांनी शिंदे गटात प्रवेश केला. भद्रावतीतील माजी उपनगराध्यक्ष प्रफुल चटकी, तीन टर्म नगरसेवक सुधीर सातपुते, प्रमोद गेडाम, अनिता मुडे, राजू सारंगधर, चंद्रकांत खारकर, शोभाताई पारखी, शितलताई गेडाम, प्रतिभाताई सोनटक्के, आशाताई निंबाळकर, प्रदीप वडाळकर यांचा समावेश लक्षणीय ठरतो.

त्याचप्रमाणे वरोरा नगरपरिषदेतील माजी नगरसेवक दिनेश यादव, प्रणाली मेश्राम, सुषमा भोयर तसेच वरोरा शहर संघटक किशोर टिपले यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. ग्रामपंचायत स्तरावरही मोठी उलथापालथ झाली असून आष्टी (काकडे), टैमुर्डा, वडेगाव, आठमुर्डी, पळसगाव, कढोली, बोर्डा, परसोडा, शेगाव बुद्रुक, सालोरी, पाचगाव, वाघेड़ा, चरूरखटी या गावांतील सर्वोच्च पदाधिकारी शिंदे गटात दाखल झाले. या भागातील ग्रामीण नेतृत्व, विशेषतः गोविंदा कुळमेथे, सुचिता ठाकरे, उमेश दातारकर, विठ्ठल जोगी, स्वप्निल वासेकर, सचिन डुकरे, भूषण बुरीले, रमेश पावडे आदींनी पक्षप्रवेश करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास व्यक्त केला. वरोरा बाजार समितीचे माजी संचालक राजू आसुटकर व संदीप चौधरी, तसेच शेकडो कट्टर शिवसैनिक, ज्येष्ठ कार्यकर्ते साळवे महाराज, ओमदेव रोडे, भाऊराव घागी, रवींद्र नांदे यांचाही सहभाग या कार्यक्रमात दिसून आला. युवासैनिक गितेश पूसनाके, यश पोटे, आशिष दडमल, संकेत नागोसे, अभय चौधरी व महिला कार्यकर्त्यांमध्ये संगीता सारंगधर, कल्पना खारकर, उषा सारंगधर, जोशना कवासे, पोर्णिमा सारंगधर यांनीही पुढाकार घेतला. मुकेश जिवतोडे यांच्या संयोजनातून पार पडलेल्या या प्रवेश सोहळ्याने वरोरा–भद्रावती परिसरात शिंदे गटाचा झेंडा अधिक भक्कमपणे फडकणार आहे. या सोहळ्यामुळे केवळ पक्षात नवसंजीवनी मिळाली नाही, तर ग्रामस्तरापासून ते शहर पातळीपर्यंत नेतृत्वाचे बळही वाढले आहे. कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विकासाच्या राजकारणासाठी जे आपल्यासोबत येतात त्यांना शिवसेना कधीही विसरत नाही. वरोरा–भद्रावतीत पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत.हे संघटन पुढील निवडणुकांसाठी निर्णायक ठरेल, असा विश्वास स्थानिक स्तरावर व्यक्त केला जात आहे.



“ अधिकारी करो सो कायदा!”

विश्वकर्मा योजनेला अधिकारी गालबोट लावणार का?

योजनेचे अधिकार विविध कार्यालयांना दिल्यामुळे लाभार्थींची होरपळ!

एनएसडीसीच्या छत्रछायेखाली प्रशिक्षण संस्थांना अभय; पारदर्शकतेचा अभाव!

जिल्हा स्तरावर माहितीचा अभाव; लाभार्थ्यांचे हाल सुरूच!

चंद्रपूर (आशिष घुमे)–पारंपरिक कौशल्यांवर आधारित असलेले व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मागे पडू नयेत, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने पंतप्रधान विश्वकर्मा योजना सुरू केली.या योजनेचा उद्देश होता देशातील कुशल कारागीर,नाव्ही,लोहार, सुतार, सोनार, मूर्तिकार, धुरीण आदी पारंपरिक व्यवसायांतील घटकांना आर्थिक पाठबळ,प्रशिक्षण आणि आधुनिक साधनांची उपलब्धता करून देणे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पारंपरिक व्यवसायांना गती देण्यासाठी आणि स्थानिक उद्योगांना आधुनिकतेची जोड देण्यासाठी पंतप्रधान विश्वकर्मा योजना १६ ऑगस्ट २०२३ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात मंजूर करण्यात आली. या योजनेसाठी केंद्र सरकारने तब्बल १३,००० कोटी रुपयांची तरतूद केली असून, पुढील पाच वर्षांत ३० लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचा शासनाचा मानस आहे.या योजनेनुसार परंपरागत व्यवसाय करणाऱ्या वंचित, मागासवर्गीय, कष्टकरी घटकांना आर्थिक, तांत्रिक व कौशल्यवाढीचे पाठबळ देणे अपेक्षित होते. शासनाने यासंबंधीचा अधिकृत जीआर जारी केल्यानंतर देशभर, विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर प्रचार व जनजागृती मोहीम राबवण्यात आली. रस्त्यांवर होल्डिंग्ज, टीव्ही चॅनेलवरजाहिराती, सोशल मीडियावरील प्रचार यामुळे ही योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचली. योजनेची जबाबदारी जिल्हाधिकारी, पंचायत समिती, नगरपरिषद, तहसील कार्यालये, खादी ग्रामोद्योग, एनएसडीसी कार्यालये अशा अनेक विविध यंत्रणांमध्ये विभागली गेल्याने लाभार्थ्यांची संभ्रमावस्था निर्माण झाली. कुठे जायचं, कोणाकडे अर्ज करायचा, याबाबत कोणतीही स्पष्टता नसल्यानं लाभार्थींची फरफट सुरू झाली. प्रथम कॉमन सर्व्हिस सेंटर चालवणाऱ्यांनी या योजनेत सक्रीय सहभाग घेतला. स्वतःचा आर्थिक फायदा पाहून त्यांनी अर्ज भरण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू केली. मात्र अर्जदारांकडून अपेक्षेपेक्षा अधिक शुल्क घेतल्याचे आरोप झाले. शासनाकडून मोफत असणाऱ्या प्रक्रियेबद्दल सामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक झाली. ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि नगरपालिका यांच्या माध्यमातून अर्जाच्या मंजुरीसाठी सुरू झालेला दुसरा टप्पा अधिकच गुंतागुंतीचा ठरला. काही ठिकाणी राजकीय हस्तक्षेप, जातीय समीकरणं, पक्षनिष्ठा आणि अपारदर्शक प्रक्रिया यामुळे पात्र लाभार्थ्यांच्या अर्जांना दुय्यम वागणूक मिळाल्याचे चित्र दिसून आले. काही ठिकाणी अप्रुव्हलसाठी आर्थिक व्यवहाराची मागणी केल्याचे आरोपही पुढे आले. पात्र लाभार्थ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध झाल्यानंतर तिसऱ्या टप्प्यात प्रशिक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, प्रशिक्षणासाठी नेमण्यात आलेली केंद्रे एनएसडीसीच्या मर्जीतील असल्याचे आरोप होत आहेत. अनेक नाममात्र व अल्पसुविधायुक्त केंद्रांना प्रशिक्षणाची जबाबदारी दिली गेली. काही ठिकाणी लाभार्थ्यांना फोन करून प्रशिक्षणासाठी बोलावण्यात आले, मात्र सुविधा, शिस्त, वेळेचे नियोजन आणि दर्जा या बाबतीत मोठी तफावत दिसून आली. विश्वकर्मा योजनेचा प्रवास सुरू असला तरी त्यात पारदर्शकतेचा अभाव आणि प्रशासनाचा गोंधळ यामुळे खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी ही योजना निवडकांच्या घशात जात आहे, अशी जनतेत भावना निर्माण झाली आहे. या सगळ्याचा खरा चेहरा आणि पुढचा टप्पा याचा सविस्तर आढावा आपण उद्याच्या भागात पाहणार आहोत.



शासनाच्या घोषणेनंतर मोठ्या आशेने हजारो लाभार्थ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवला. मात्र, योजना चांगली, पण अंमलबजावणी ढासळलेली अशी स्थिती सर्वत्र पहावयास मिळत आहे. विविध शासकीय यंत्रणांमध्ये अधिकारांचे विकेंद्रीकरण, माहितीचा अभाव, प्रक्रियेतील गोंधळ आणि अपारदर्शकता यामुळे लाभार्थ्यांचे हाल सुरू झाले आहेत.या योजनेच्या अंमलबजावणीतील विसंगती, स्थानिक पातळीवरील अनागोंदी आणि लाभार्थ्यांच्या व्यथा यांचा सखोल मागोवा घेणारा ही विशेष बातमी.

भाग–१

सावनेरच्या धर्तीवर चंद्रपूरला मिळणार निसर्गसंपन्न ईको पार्क

आ.जोरगेवार यांची संभाव्य जागेची पाहणी

वेकोली अधिकाऱ्यांशी चर्चा, जागा निवड व आराखडा तयार करण्याचे आ.जोरगेवार यांचे निर्देश



चंद्रपूर । प्रतिनिधी

शहरात पर्यावरणपूरक पर्यटन आणि नागरिकांसाठी निसर्गस्नेही जागा उपलब्ध व्हावी या हेतूने सावनेर येथील ईको पार्कच्या धर्तीवर चंद्रपूरमध्ये ईको पार्क उभारण्याचा आमदार किशोर जोरगेवार यांनी पुढाकार घेतला आहे. १७ जून २०२५ रोजी, मंगळवार रोजी त्यांनी वेकोलीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली व संभाव्य ईको पार्कच्या जागेची पाहणी करून सूक्ष्म नियोजनाच्या माध्यमातून प्रक्रिया गतिमान करण्याचे निर्देश दिले. या वेळी वेकोलीचे योजना अधिकारी प्रिया शंकर विना, अमला खनन अधिकारी उज्वल बोढे, लालपेठ उप क्षेत्रीय प्रबंधक मुस्ताक अहमद, पर्यवेक्षक अधिकारी शुक्ला, सुभाष ताजने, भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रदेश निमंत्रित सदस्य तुषार सोम, माजी शहराध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, भाजप नेते प्रकाश देतवळे, बलराम डोडाणी, रवी गुरनुळे, मनोज पाल, माजी नगरसेवक प्रदीप किरमे, अजय जयस्वाल, नामदेव डाहूले, अमोल शेंडे, रंजन ठाकूर, सुमित बेले आदी उपस्थित होते.आमदार किशोर जोरगेवार यांनी नुकतीच नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील ईको पार्कला भेट देऊन तेथील यशस्वी मॉडेलची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी पार्कची रचना, संकल्पना व व्यवस्थापन यांचा सविस्तर अभ्यास केला. सावनेर ईको पार्कमध्ये साकारण्यात आलेली कोळसा खाणीविषयीची वेकोलीची माहितीपर प्रदर्शने, हरित पट्टे, जलाशय व पर्यावरण संवर्धनाची आधुनिक तंत्रे यांचा अनुभव घेत आमदार जोरगेवार यांनी चंद्रपूरमध्येही असेच आधुनिक आणि निसर्गाभिमुख ईको पार्क साकारण्याचा संकल्प व्यक्त केला.१७ जून रोजी झालेल्या बैठकीत, वेकोली व इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करत प्रारंभिक आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीत जागेची निवड, विकास आराखडा, पर्यावरणीय मानके व जनसहभाग याबाबत सखोल विचारमंथन झाले.बैठकीनंतर आमदार जोरगेवार यांनी प्रत्यक्ष पाहणीसाठी शहरातील जमनजट्टी परिसरातील वेकोलीच्या मालकीच्या जागेची पाहणी केली. त्यांनी रिवलबेल्ट कॉरी या भागाचीही पाहणी केली. येथे जुनी खुली कोळसा खाण असून त्यात पावसाचे व नदीचे पाणी साचले आहे. या ठिकाणी निळसर रंगाचे सुंदर जलाशय तयार झाले असून परिसरात घनदाट वृक्षराजी, जलचर व पक्ष्यांचे वास्तव्य दिसून येते. त्यामुळे ही जागा नैसर्गिक ईको पार्कसाठी अत्यंत योग्य असल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले.त्यांनी सदर जागा ईको पार्कसाठी निश्चित करण्याच्या सूचना देत, तातडीने सविस्तर सर्वेक्षण व विकास आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. चंद्रपूर शहरात पर्यावरण आणि पर्यटनाच्या दृष्टीने नागरिकांना लाभदायक ठरणारा हा प्रकल्प असून, सर्व विभागांनी प्रामाणिकपणे काम करत हे ईको पार्क प्रत्यक्षात साकार करावे, असे आवाहन आमदार जोरगेवार यांनी यावेळी केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .